N.C.R.B. (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** दिघी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0330 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/08/2024 05:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 16/07/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/07/2024
   **Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 01/08/2024 **Time (वेळ):** 04:41 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 008
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2024 04:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** आंबा चौकाचे पुढे 100 ,मिटरवर सर्व्हिस रोड,लगत वडमुखवाडी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**



पोलीस निरीक्षक दिघी पोलीस स्टे., पुणे
Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दिपक विनायक राहिंज धंदा-व्यवसाय-

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्रणव टवर ,चोविसावाडी,च-होली ,पुणे ,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्रणाम टवर ,चोविसावाडी,च-होली ,पुणे ,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9764445753

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे श्री. अमोल दशरथ जाधव पद-पोलीस हवालदार ब.नं. 717 | | | 1. दिघी पोलीस, स्टेशन पिं चिं आयुक्तालय पुण,रा धनलक्ष्मी विहार,बिल्डींग ,फ्ल नं 504, धनोरी पोलीस चौकीजवळ, धानोरी, पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद जबाब दिनांक 01/08/2024 गुन्हा रजि. नंबर व कलम - 330 /2024. भ्र.प्र.का.क. 7,7 (अ)
मी दिपक विनायक राहींज वय-42 वर्षे धंदा-व्यावसाय,रा.फ्लॅट.नं ए-804, प्रणाम टॉवर, चोविसावाडी, च-होली, ता.हवेली, जि.पुणे, मो.नं.9764445753.

मी दि.16/07/2024 रोजी अँटीकरप्शन ब्युरो पुणे येथे जाऊन तेथील पो.उप-अधीक्षक श्री जाधव यांना दिघी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय पुणे येथील कर्मचारी अमोल जाधव यांचेविरुद्ध लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. श्री.जाधव साहेब यांनी मला पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांची ओळख करुन देऊन त्यांचेकडे तक्रार देण्यास सांगितले. त्यानुसार मी शिंदे साहेब यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगुन दि.16/07/2024 रोजी अमोल जाधव यांना भेटायला जाणार असल्याचे शिंदे साहेबांना सांगितले. त्यानंतर मी त्यांचेकडे माझी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे- "वरील विषयान्वये अर्ज करतो की, माझ्या पत्नीने एस.आस्था चोविसावाडी येथे ए-506 हा फ्लॅट अनुप जमतानी व दिनेश तापकीर यांच्याकडुन सन-2021 मध्ये खरेदी घेतला होता. (नोटरी रजिस्टर) नमुद फ्लॅट अनुप जमतानी यांनी दिनेश तपकीर व माझे पत्नीच्या परस्पर दुस-या व्यक्तीस विक्री केला आहे. म्हणुन मी अनुप जमतानी याचे विरुध्द दिघी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड येथे तक्रार अर्ज केला होता. नमुद तक्रार अर्जावरुन अनुप जमतानी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबत पाठपुरावा करण्यासाठी मी दि. 15/07/2014 रोजी दिघी पोलीस स्टेशन मध्ये गेलो असता तेथील पोलीस कर्मचारी अमोल जाधव यांनी माझ्या नमुद अर्जावर गुन्हा दाखल करुन जमतानी यांचेवर कायदेशीर कारवाई करणेकरीता त्यांचे पोलीस निरीक्षक ढमाळ साहेब यांचेकरीता व पोलीस अंमलदार मुकणे यांचेकरीता दोन लाख रुपयांची मागणी केली आहे. त्यांनी मागितलेली रक्कम ही लाच आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तरी त्यांच्यावर योग्यती कारवाई करावी ही विनंती." वगैरे बाबतची तक्रार दिली.

तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांनी उपलब्ध केलेल्या शासकीय पंचाची व स्टाफची माझ्याशी ओळख करुन दिली. पंच, पोलीस स्टाफ असे आम्ही पडताळणी कारवाईसाठी ऑफिस मधुन सायं 04.45 वा. चे सुमारास निघुन मॅगझीन चौक भोसरी येथे जाऊन थांबलो. शिंदे साहेबांनी पडताळणी कारवाईबाबत व व्हाईस रेकॉर्डरबाबत मला योग्यती माहीती दिली. माझ्या तक्रारीचे पडताळणी करण्यासाठी माझेसोबत व्हॉईस रेकॉर्डर देवून शासकीय पंच श्री. निखील आनंदराव मोरे यांचेसह मला श्री. अमोल जाधव यांना भेटण्यासाठी दिघी पोलीस स्टेशन येथे सायं 06.09 वा.चे सुमारास पाठविले. तेथे गेल्यानंतर माझी व श्री अमोल जाधव यांची भेट होऊन माझ्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान मी त्यांना, 'तुम्ही दोन लाख सांगितलेले,फायनल आकडा सांगा प्लीज.' त्यावर श्री .जाधव म्हणाले की, 'वीस हजार कमी करुन टाक व बाकीचे देऊन टाक, बस आता बाकीचे तरी व्यवस्थीत येउ दे, प्रत्येकाला कॉमन कॉमन.' त्यावर मी त्यांना, ' फक्त वीस कमी' त्यावर श्री जाधव म्हणाले की, 'अच्छा ठीक आहे एक सत्तर करुन टाक.' त्यावर मी त्यांना म्हणालो, 'आता मला सांगा एक सत्तर फायनल झाले पण पी.आय ढमाळ व मुकणे यांचे कसे राहणार,' त्यावर श्री जाधव म्हणाले की, 'ते पण इनल्क्युडींग आहे त्यात. गुन्हा दाखल झाला की तु तयारीत रहा.' असे म्हणुन श्री अमोल जाधव यांनी माझ्याकडे सुरुवातीस 02,00,000 /- (दोन लाख) रुपयांची व तडजोडी अंती 01,70,000/- (एक लाख सत्तर हजार) रुपयांची लाच मागणी केल्याचे निषपन्न झाले. त्यानंतर आम्ही शिंदे साहेब थांबले त्याठिकाणी परत आलो. गुन्हा दाखल झाल्यावर श्री जाधव हे फोन करणार आहेत त्यामुळे पुढील कारवाई गुन्हा दाखल झाल्यावर करण्याचे ठरविले.
दि. 29/07/2024 रोजी श्री अमोल जाधव यांचा मला गुन्हा दाखल झालेबाबतचा फोन आला. व आपले



Scanned with OKEN Scanner

ठरल्याप्रमाणे पैशाची तयारी केली का विचारले, परंतु मी त्यांना मुदत मागुन घेतली. त्याबाबत मी शिंदे साहेबांना सर्व माहीती दिली. माझ्या काही घरगुती अडचणीमुळे पुढील सापळा कारवाई दि.31/07/2024 रोजी करण्याचे ठरविले. दि. 18/07/2024 व दि. 19/07/2024 रोजी मी श्री जाधव यांना गुन्हा दाखल झाला की नाही याबाबत व्हाटस्अप कॉल केले. मी दि.31/07/2024 रोजी सकाळी शिंदे साहेब यांना संपर्क करुन सापळा कारवाईसाठी माझे राहते घराजवळ (चोविसावाडी) सापळा पथकासह येण्याची विनंती केली. दु.12.00 वा. चे सुमारास शिंदे साहेब त्यांच्या सापळा पथकासह प्रणाम टॉवर च्या जवळ आल्यानंतर मी त्यांना भेटलो. त्यांनी सापळा पथकाची व माझी एकमेकांना पुन्हः ओळख करुन दिली. मी माझ्या बचतीतील 01,00,000/- (एक लाख) रुपये लाच रक्कम म्हणुन शिंदे साहेब यांच्याकडे दिली. उर्वरीत लाच रकमेसाठी शिंदे साहेब यांनी त्यांच्याकडील 70,000/- रुपयांच्या 500/-रुपये लिहिलेल्या खेळण्यातील एकुण- 140 खोटया नोटा सहजासहजी ओळखता येणार नाहीत अशाप्रकारे ख-या नोटांच्यासोबत मिसळुन त्या रकमेला त्यांनी अँथ्रासीन पावडर लावून ती रक्कम दोन पांढ-या पाकीट (लिफापा) मध्ये माझ्याकडे परत दिली. शिंदे साहेब यांनी मला पुढील सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या. माझ्यासोबत व्हॉईस रेकॉर्डर आणि पंच श्री. मोरे यांना सोबत देवून मला श्री जाधव यांना भेटण्यासाठी जाधव यांनी सांगितल्या प्रमाणे आंबा चौक,आळंदी-विश्रांतवाडी रोड, वडमुखवाडी येथे दु. 12.47 वा. चे सुमारास पाठविले. आम्ही श्री.जाधव यांना भेटण्यासाठी नमुद ठिकाणी गेलो. माझे पाठोपाठ शिंदे साहेब व त्यांच्या पथकाचे लोक आंबा चौकाच्या आजुबाजूला येऊन थांबून राहिले. पंच व चालक हे माझ्या गाडीतच थांबुन राहिले. मी तेथे जाऊन श्री जाधव यांना त्यांच्या लाल रंगाच्या एम.एच 12 क्यु एफ.9132 या मारुती सुझुकी ब्रीझा गाडीत जाऊन भेटलो. तेथे मी माझ्या कामाबाबत त्यांच्यासोबत चर्चा केली. व 'ठरल्याप्रमाणे एक लाख सत्तर हजार आणले आहेत. एका पाकीटात एक लाख व दुस-यात सत्तर हजार रुपये,'असे श्री जाधव यांना बोललो असता त्यांनी हाताच्या ईशा-याने गाडीच्या डॅशबोर्डच्या कप्प्यामधे लाच रक्कम ठेवण्याचा ईशारा करुन श्री जाधव यांनी माझ्याकडुन 01,70,000/- (एक लाख सत्तर हजार) रुपयांची लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा पद्धतीने माझ्या डोळ्यावरील चष्मा काढुन लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला. सापळा पथकाने लगेचच श्री. जाधव यांना दि.31/07/2024 रोजी दुपारी 01.20 वाजताच्या सुमारास आंबा चौकच्या पुढे, विश्रांतवाडी रोडवर,वडमुखवाडी येथे ताब्यात घेतले. शिंदे साहेब यांनी श्री जाधव यांना त्यांचा नाव पत्ता विचारले. तसेच संपुर्ण कारवाईचा सविस्तर पंचनामा व स्क्रिप्ट बनविली आहे. तरी अनुप जमतानी यांचेविरुद्ध मी दिघी पोलीस स्टेशन येथे केलेल्या तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल करणेकामी मदत करणेसाठी व गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढे योग्यती मदत करणेसाठी आलोसे श्री अमोल दशरथ जाधव वय-43 वर्षे धंदा-नोकरी पद-पोलीस हवालदार नेमणुक दिघी पो.स्टे रा. फ्लॅट.नं. 504, धनलक्ष्मी विहार,धानोरी पोलीस चौकीजवळ, धानोरी,पुणे यांनी फिर्यादी यांचे कडे वरीष्ठ यांचेकरीता व स्वत: करीता दि.16/07/2024 रोजी सुरुवातीस 02,00,000/- (दोन लाख) रुपये व तडजोडी अंती 01,70,000/- (एक लाख सत्तर हजार) रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम दि. 31/07/2024 रोजी आंबा चौक,आळंदी विश्रांतवाडी रोड.वडमुखवाडी येथे स्विकारली आहे. म्हणुन माझी श्री अमोल जाधव यांचे विरुद्ध फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहीली असून माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vijay shamrao dhamal(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

1/8/24 Deepak v. Rahinj

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पिंपरी चिंचवड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vijay shamrao dham
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

Recieved
1/8/2024
5.00 AM.



Scanned with OKEN Scanner